महिला बचत गटांच्या नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पनांना प्रोत्साहित करण्यासाठी “हिरकणी-नवउद्योजक महाराष्ट्राची” योजनेत सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्रमांक कौविउ-२०१९/प्र.क्र.१०/अभियान-१,
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ जुलै, २०१९.

वाचा : कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक
कौविउ-२०१९ /प्र.क्र.१०/अभियान-१, दिनांक २१/०२/२०१९.

प्रस्तावना :

राज्यातील महिला बचत गटांना स्टार्टअपच्या माध्यमातून उद्योजक बनण्यास प्रोत्साहित करण्याकरिता राज्यात “**हिरकणी - नवउद्योजक महाराष्ट्राची**” योजना राबविण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक २१/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिला बचत गटांना होऊन त्यायोगे राज्यात नवउद्योजक निर्माण होण्याच्या दृष्टीने सदर शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

महिला बचत गटांच्या नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पनांना प्रोत्साहित करण्यासाठी उक्त दिनांक २१/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या “हिरकणी-नवउद्योजक महाराष्ट्राची” या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिला बचत गटांना होऊन त्यायोगे राज्यात नवउद्योजक निर्माण होण्याच्या दृष्टीने दिनांक २१/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ (२) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-

२. योजनेचे लाभार्थी

राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (National Rural Livelihood Mission-NRLM), राष्ट्रीय शहरी जीवनोन्नती अभियान (National Urban Livelihood Mission-NULM) व महिला आर्थिक विकास महामंडळ (MAVIM) अंतर्गत स्थापन करण्यात आलेले व राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानातील पंचसूत्रीचे पालन करणारे महिला बचत गट हे या योजनेचे लाभार्थी असतील.

३. अंमलबजावणीची यंत्रणा

सदर योजनेची जिल्हा स्तरावर अंमलबजावणी नियोजन विभागाच्या दिनांक १४/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हा नाविन्यता परिषदेमार्फत करण्यात येईल व तालुका स्तरावरील अंमलबजाणीकरिता प्रत्येक तालुक्यात तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्याच्या योजनेबाबतची आवश्यक असलेली सर्व माहिती संकलित करुन सदर प्रस्ताव जिल्हा नाविन्यता परिषदेसमोर सादर करणे, लाभार्थींना अर्थसहाय्य वितरण व इतर औपचारिकता पूर्ण करणे इत्यादी कार्यवाही संबंधित सहाय्यक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्यामार्फत करण्यात येईल.

<u>**तालुकास्तरीय समिती**</u>

१. तहसिलदार	-	अध्यक्ष
२. गट विकास अधिकारी	-	सह अध्यक्ष
३. तालुका महिला व बालविकास अधिकारी	-	सदस्य
४. तालुकास्तरीय अग्रणी बँक व्यवस्थापक	-	सदस्य
५. सहाय्यक गट विकास अधिकारी	-	सदस्य सचिव

४. योजनेची कार्यपद्धती

२) सदर नाविन्यपूर्ण संकल्पना उद्योगात रुपांतरीत करण्यासाठी सहभागी महिला बचत गटांना तालुका स्तरावर मार्गदर्शन करण्यात येऊन त्यांना तालुका मंचावर सादरीकरण करण्याची संधी देण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१६१५२१५००५०३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=34e795101cfc08377272f409bc9348c5d84ec89bc33bd49bcb71e896a5e56b29, serialNumber=eb1cb39de10fe09852a24a5fa63add6d5b204146d3716e740e20fb4b2a378a55, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2019.07.16 15:30:24 +05'30'

(स.दि.खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा.मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. सर्व विधानपरिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व विभाग.
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई,
१०. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-१), महाराष्ट्र, मुंबई,
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-२), महाराष्ट्र, नागपूर,
१४. महालेखापाल (लेखा परीक्षा-१), महाराष्ट्र, मुंबई,
१५. महालेखापाल (लेखा परीक्षा-२), महाराष्ट्र, नागपूर,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१९. सर्व विभागीय आयुक्त,
२०. सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती.
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
२२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
२४. उपसंचालक, विभागीय मुख्यालय, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
२५. निवड नस्ती.